## यादी क्रमांक २

## अ) कालांतराने घरबांधण्यासाठी जमीन खरेदी करावयाची असल्यास घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याकरिता लागणारी आवश्यक ती माहिती व कागदपत्रे

**( अग्रिम मंजूरीची मर्यादा - घराची प्रत्यक्ष किंमत किंवा मूळ वेतनाच्या ५० पट किंवा रु. ७,५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम एकाच हप्त्यात मंजूर करण्यात येईल.)**

१) नांव :- पद :-

२) कार्यालयाचे नांव :-

३) सध्याचे मूळ वेतन :-

४) शासकीय सेवेत रुजू झाल्याचा दिनांक :-

५) सेवानिवृत्तीचा दिनांक :-

६) अग्रिमाची मागणी (रुपयात) :-

७) अग्रिम मंजूर झाल्यास अग्रिमाच्या परतफेडीची आपली दरमहा क्षमता (रुपये)
(किमान व कमाल रक्कम नमूद न करता एकच रक्कम नमूद करावी.)

८) कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे पदनाम.

९) कार्यालयातील देयके ज्या कोषागार / उपकोषागार कार्यालयात सादर करुन परित केले जातात त्या कार्यालयाचा पत्ता.

१०) कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक

११) जागा खरेदीचा करारनामा :- जर जागा खरेदी करावयाच्या प्रयोजनार्थ अग्रिमाची मागणी केली असल्यास खालील माहिती करारनाम्यात अंतर्भुत असावी.

जागा खरेदीबाबत केलेल्या करारनाम्यात (इसार पावती ग्राह्य धरली जाणार नाही) खालील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे. तरच तो ग्राह्य धरण्यात येईल.

- अ) करारनामा हा कमीत कमी रु. २०/- च्या स्टँपपेपर केलेला असावा व तो वकील / नोटरी यांच्या समक्ष केलेला असावा.
- ब) करारनाम्यात जागा विक्रेत्याचे व खरेदीदाराचे पूर्ण नांव व स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.
- क) जागेच्या खरेदीची एकूण किंमत, करारनामा करतेवेळी बयाणा म्हणून दिलेली रक्कम तसेच करारनाम्याचा वैधता दिनांक करारनाम्यात नमूद केलेला असावा.
- ड) करारनाम्यात जागेचे संपूर्ण पत्त्यासह वर्णन व सर्व्हे क्रमांक, प.ह.नं. इ. नमूद केलेला असावा.
- इ) करारनाम्यात जागेची चतु:सीमा स्पष्ट असावी. (चतु:सीमेचे वर्णन, हक्कदाराचे नांव, उपयोजन इ.)

१२) जागा विक्रेत्याच्याच नावावर असल्याबद्दलचा शासकीय पुरावा (सात बाराचा उतारा)

१३) जागा कुठेही गहाण नसल्याबाबत किंवा कुठलाही बोजा नसल्याबाबत विक्रेत्याचे मूळ शपथपत्र. (रु.२०/- च्या स्टँप पेपरवर वकील / नोटरी यांच्या समक्ष केलेले)

कृ.मा.प.

१४) जागेचे मुल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींनी दिलेले मूल्यांकन प्रमाणपत्र. (Authorised Valuers)

१५) यापूर्वी जर घर / जागा खरेदीकरिता किंवा घरबांधणीच्या प्रयोजनासाठी शासकीय किंवा निमशासकीय संस्थेकडून कर्ज घेतले असल्यास त्याचा तपशील.

१६) आपली पत्नी / पती शासकीय / निमशासकीय कार्यालयात नोकरीला आहे काय ? असल्यास त्यांनी शासकीय / निमशासकीय कार्यालयातून घरबांधणी अग्रिमांतर्गत यापूर्वी कर्ज घेतलेले आहे काय ? कर्ज घेतलेले असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

१७) घेणार असलेल्या ठिकाणी माझे स्वतःचे, पत्नीचे अथवा माझ्या अज्ञान (Minor Children) मुलाचे नांवे कोणतेही घर किंवा जागा नाही याबाबत शपथपत्र.

१८) आपणास अनुज्ञेय ठरत असलेल्या अग्रिम रकमेपेक्षा जागा खरेदीस जास्त रकमेची आवश्यकता असल्यास उर्वरित रक्कम आपण उभारु शकाल का ? व ते उभारण्याचे मार्ग कृपया नमूद करावे.

१९) खाली नमूद केलेली कागदपत्रे अग्रिमाची रक्कम आपणास प्राप्त झाल्यापासून एक महिन्याचे आत मंत्रालयास सादर करणे आवश्यक असल्याने ते एका महिन्याच्या कालावधीत सादर करण्याबाबतचे हमीपत्र.

**कर्मचाऱ्याची स्वाक्षरी**

असे प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त बाबींपैकी कार्यालयाशी संबंधित असलेली माहिती कार्यालयाच्या अभिलेखावरुन तपासण्यात आली असून नमूद केलेली माहिती बरोबर आहे.

**कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी**
**व पदनाम**

---

**टिप :** **१) अनुज्ञेयतेनुसार मंजूर होणारी अग्रिमाची रक्कम एकाच हप्त्यात देण्यात येईल.**

**२) अग्रिम मंजुरीनंतर जागा विक्रेत्यानी जागा विक्रीचे नाकारले किंवा काही कारणास्तव घराचा व्यवहार न झाल्यास अग्रिमाची रक्कम दुसरे घर घेण्यासाठी अनुज्ञेय ठरणार नाही.**

**३) पती व पत्नी दोघेही शासकीय सेवेत असल्यास दोहोपैकी फक्त एकासच घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय ठरते.**

---

**अग्रिम मंजूरीची रक्कम कोषागारातून काढून आपणास प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत खालील कागदपत्रे सादर करावी लागतील.**

१) आपणास आपल्या कार्यालयाने रक्कम उपलब्ध करुन दिल्याचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक
२) जागा विक्रेत्याला रक्कम मिळाल्याची मुद्रांकित पावती. (सदर पावती जागा विक्रेत्याने रु. १/- च्या रेव्हेन्यू स्टँपवर लिहून दिलेली असावी.)
३) गहाणखत बी-१ (निबंधक कार्यालयात नोंदणीकृत केलेले)
४) करारपत्र अे-१
५) जागा खरेदीसाठी नोंदणी शुल्क भरल्याची पावती.
६) जागा खरेदी केल्यावर प्राप्त होणारी रजिस्ट्रीची प्रत.

---

**ब) जागा विकत घेऊन त्यावर घर बांधावयाचे असल्यास घरबांधणी अग्रिम मंजूरी करिता लागणारी आवश्यक ती माहिती व कागदपत्रे**

**( अग्रिम मंजूरीची मर्यादा - घराची प्रत्यक्ष किंमत किंवा मूळ वेतनाच्या ५० पट किंवा रु. ७,५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम एकाच हप्त्यात मंजूर करण्यात येईल.)**

१) यादी क्रमांक २ (अ) मध्ये नमूद केलेली माहिती / कागदपत्रे.
२) यादी क्रमांक २ (ड) मध्ये नमूद केलेली माहिती / कागदपत्रे.

---

**क) पूर्वीची खरेदी केलेल्या जागेवर घर बांधावयाचे असल्यास घरबांधणी अग्रिम मंजूरी करिता लागणारी आवश्यक ती माहिती व कागदपत्रे**

**( अग्रिम मंजूरीची मर्यादा - घराची प्रत्यक्ष किंमत किंवा मूळ वेतनाच्या ५० पट किंवा रु. ७,५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम एकाच हप्त्यात मंजूर करण्यात येईल.)**

१) यादी क्रमांक २ (अ) मधील अ. क्र. ३ ते १० ची माहिती.
२) खरेदी केलेल्या जागेची मालकी आपलीच असल्याबद्दलचा शासकीय पुरावा सादर करावा.
३) बांधावयाच्या घराची जागा कुठेही गहाण नसल्याबद्दलचे शपथपत्र (मूळप्रत) (रु. २०/- च्या स्टँपपेपरवर वकील / नोटरी यांच्या समक्ष केलेले)
४) यादी क्रमांक २ (ड) मध्ये नमूद केलेली माहिती / कागदपत्रे.

---

**ड) घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याकरिता आवश्यक ती माहिती व कागदपत्रे**

१) यापूर्वीच घर खरेदीकरिता किंवा घरबांधणीकरिता शासकीय / निमशासकीय / वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतले असल्यास, त्याचा तपशील.
२) आपली पत्नी / पती शासकीय / निमशासकीय कार्यालयात नोकरीला आहे काय ? असल्यास त्यांनी शासकीय / निमशासकीय कार्यालयातून घरबांधणी अग्रिमांतर्गत यापूर्वी कर्ज घेतलेले आहे काय ? कर्ज घेतलेले असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.
३) घर बांधावयाच्या ठिकाणी स्वतःचे पत्नीचे अथवा आपल्या अज्ञान (Minor Children) मुलाचे नावे कोणतेही घर नाही याबाबतचे शपथपत्र.
४) महानगरपालिका / नगरपालिका किंवा ग्रामपंचायत यांनी मंजूर केलेला नवीन घराचा आराखडा.
५) महानगरपालिका / नगरपालिका किंवा ग्रामपंचायत यांनी घर बांधण्यासाठी दिलेल्या परवानगीची सांक्षांकित प्रत.
६) घरबांधणीसाठी येणाऱ्या खर्चाबाबतचे मूल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींनी दिलेले अंदाजपत्रक (Authorised Valuers)

७) खालील नमूद केलेली कोगदपत्रे अग्रिमाची रक्कम आपणास प्राप्त झाल्यापासून एक महिन्याचे आत संचालनालयास सादर करणे आवश्यक असल्याने ते एका महिन्याच्या कालावधीत सादर करण्याबाबत हमीपत्र.

**कर्मचाऱ्याची स्वाक्षरी**

---

असे प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त बाबींपैकी कार्यालयाशी संबंधित असलेली माहिती कार्यालयाच्या अभिलेखावरुन तपासण्यात आली असून नमूद केलेली माहिती बरोबर आहे.

**कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी**
**व पदनाम**

टीप :- १) अनुज्ञेयतेनुसार मंजूर होणारी रक्कम पहिल्या हप्त्यात ३०%, दुसऱ्या हप्त्यात ४०%, तिसऱ्या हप्त्यात ३०% याप्रमाणे मुक्त करण्यात येईल.

२) यादी २ अ मधील टीप क्रमांक १ व २

---

**अग्रीम मंजूरीची रक्कम कोषागारातून काढून आपणास प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत खालील काग्रदपत्रे सादर करावी लागतील.**

१) आपल्या कार्यालयाने आपणास रक्कम अदा केल्याचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक.

२) रक्कम ज्या कारणासाठी मंजूर केली त्याच कारणासाठी खर्च केल्याची मुद्रांकित पावती उदा. विटा, सिमेंट, लोखंड, लाकूड इ. घर बांधणीसाठी आवश्यक साहित्य ज्या विक्रेत्याकडून खरेदी केले त्या विक्रेत्याने दिलेली मुद्रांकित पावती. (रु. १/- च्या स्टँप रेव्हेन्यू स्टँम्पवर विक्रेत्याच्या स्वाक्षरीसह)

३) जागा खरेदीसह घर बांधावयाचे असल्यास गहाणखत बी व यापूर्वीच विकत घेतलेल्या जागेवर घर बांधावयाचे असल्यास गहाणखत बी-२ (निबंधक कार्यालयात नोंदणीकृत केलेले)

४) घराचे बांधकाम जोत्यापर्यंत / छतापर्यंत बांधून पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

५) अग्रिम मंजूरीच्या शेवटच्या हप्त्याची रक्कम प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत घराचे बांधकाम पूर्ण झाल्याचे ग्रामपंचायत / नगरपरिषद / महानगरपालिकेचे प्रमाणपत्र.

६) घराचा विमा शासकीय विमा निधीकडे काढल्याची पावती.